भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत पश्चिमही...

चन्द्रशेखर पुरन्दरे

'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' सारखी संस्था दरवर्षी जगातल्या भ्रष्टाचाराचा अभ्यास करते आणि विकसनशील देश सर्वाधिक भ्रष्टाचारी असल्याचा निष्कर्ष काढते. त्यात तथ्य असतंच, पण पश्चिमेतल्या विकसित देशांचा कारभारही फार 'साळसूद' असतो, असं नाही. तिथल्या संस्थात्मक भ्रष्टाचाराच्या 'कोटी-कोटी' उड्डाणांमुळे हर्षद मेहता - तेलगीदेखील फिके पडतील. फरक इतकाच की तिथला भ्रष्टाचार सर्वसामान्यांवर थेट आदळत नाही, पण त्याची अप्रत्यक्ष झळ त्यांना सोसावीच लागते...

विकसनशील गरीब देशांमध्ये काय किंवा पश्चिमेतल्या विकसित देशांमध्ये काय, भ्रष्टाचार हा नागरिकांच्या चिंतेचा आणि चर्चेचा विषय बनला आहे. अगदी ढोबळमानाने बोलायचं झालं, तर ज्यांच्याकडे लाच देण्याची क्षमता आहे, त्यांना व्यवस्थेकडून जास्त फायदे मिळवता येतात. समाजातल्या तळाच्या स्तराची मिळकतच इतकी कमी असते की, लाच देऊन आपलं काम साधणं त्याला परवडणारंच नसतं. परिणामी, या स्तराची जास्त परवड होते. भ्रष्टाचारामुळे या स्तरापर्यंत सरकारी किंवा इतर सहाय्य एकतर पोहचत नाही किंवा पोहचलं तरी ते अपुरं असतं. चीन किंवा मध्ये पूर्वेतल्या देशांमध्ये, जिथे एकाधिकारशाही आहे तिथेही हे घडतं. पण आपण लोकशाहीवाल्या देशांपुरता विचार करू. तिचं भ्रष्टाचारामुळे लोकशाहीसमोरच प्रश्नचिन्ह उभं राहतं.

'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' ही आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणारी संघटना दरवर्षी जगातील सुमारे १५९ देशांमधील भअष्टाचाराच्या प्रमाणाचा आढावा घेते. हा आढावा एक ते दहा अशा मापदंडावर मांडला जातो. कमालीचे भ्रष्ट देश 'एक' या आकड्याजवळ जातात, तर जिथे भ्रष्टाचार अजिबात नाही ते देश 'दहा' या आकड्याजवळ जातात. या संस्थेच्या गेल्या वर्षीच्या अहवालानुसार, पश्चिम युरोपातील बहुतेक देश आठ ते साडेनऊच्या दरम्यान आहेत. फ्रान्स व अमेरिका साडेसातवर आहेत. भारत आणि चीन तीनच्या आसपास आहेत. आफ्रिकेतले बहुतेक देश तसंच नेपाळ, बांगलादेश वगैरे त्याहूनही खाली, म्हणजे भ्रष्टाचाराने जास्त पोखरलेले आहेत. यातून असा निष्कर्ष समोर येतो की, गरीब व विकसनशील जग सर्वाधिक भ्रष्ट आहे, विकसित जग तुलनेनं कमी भ्रष्टाचारी आहे.

भ्रष्टाचार म्हणजे काय आणि तो का होतो याचा विविध सामाजिक शास्त्रांनी अभ्यास केला आहे. सत्तेचा गैरवापर हे भ्रष्टाचाराचं प्रमुख लक्षण. समाजशास्त्रानुसार, भ्रष्टाचार विशिष्ट समाजाच्या संस्कृतीवर अवलंबून असतो. विधीशास्त्रानुसार, भ्रष्टाचार एकतर कायद्यांचा अपुरेपणा दर्शवतो किंवा कायद्यांच्या अमंलबजावणीमधला अपुरेपणा दर्शवतो. राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्रानुसार, ज्या देशांमध्ये संस्था कमकुवत असतात, सरकारी कर्मचाऱ्यांना पगार कमी असतात. बाजार अपरिपक्व असतो. बाजारावर सरकारी नियंत्रण जास्त असतं, तिथे भ्रष्टाचार फोफावतो.

'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' तसंच विविध सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांनी भ्रष्टाचाराविषयी केलेल्या विश्लेषणाचा सूर सर्वसाधारणपणे असा आहे की, कमकुवत राज्यसंस्था-अर्थसंस्था, अपरिपक्व बाजार, सरकारी कर्मचाऱ्यांचं कमी वेतन आणि भ्रष्टाचाराला सांस्कृतिक मुभा अशी अविकसित किंवा विकसनशील देशांमधील स्थिती भ्रष्टाचाराला खतपाणी घालते; पश्चिमेत अशी स्थिती नाही. अशा प्रकारच्या विश्लेषणामागे एकतर अहंगंड आहेच. शिवाय आणखीही एक महत्त्वाचं कारण आहे. ते म्हणजे, विकसनशील जगामधील भ्रष्टाचाराप्रमाणे पश्चिमेतला भ्रष्टाचार सामान्य माणसाला पदोपदी छळत नाही; पण म्हणून 'भ्रष्टाचार म्हणजे विकसनशील जग' असं मानणं वस्तुस्थितीला धरून होणार नाही.

भारतासारख्या देशांत वाहतुकीचे नियम तोडले. कॉर्पोरेशनमधून एखादी मंजुरी मिळवायची असेल तर लाच द्यावी लागते. पश्चिमेत असा किरकोळ भ्रष्टाचार होत नाही. त्यामुळं इथली भ्रष्टाचाराची व्याख्या आपल्या व्याख्येपेक्षा थोडी निराळी असते. उदाहरणार्थ, स्कॉटलंडच्या पार्लमेंटच्या इमारतीचं बांधकाम. १९९८ साली आराखड्याच्या टप्प्यावर या बांधकामाचा खर्च पाच कोटी पौंड निश्चित करण्यात आला

होता. प्रत्यक्षात आठ वर्षांनी बांधकाम पूर्ण झालं तेव्हा हा खर्च चाळीस कोटी पौंडावर गेला. यात पैसे कोणीच खाल्ले नाहीत. आपण याला गलथानपणा म्हणू, इथं याला भ्रष्टाचार म्हणतात. वैयक्तिक लाभासाठी पदाचा गैरवापर करणं याला आपण भ्रष्टाचार म्हणतो. त्याला आपण पारंपरिक भ्रष्टाचार म्हणू, तोही इथं असतोच. पण त्याचं प्रमाण कमी. इथं, भ्रष्टाचार प्रामुख्याने संस्थात्मक असतो. या भ्रष्टाचाराचा आवाका आपल्याकडच्या वैयक्तिक भ्रष्टाचाराच्या कितीतरी पटींनी जास्त असतो. इथे संस्थात्मक भ्रष्टाचार अर्थसंस्थांमध्ये होतो. राज्यसंस्थांमध्ये होतो आणि प्रसारमाध्यमांतही होतो.

पश्चिमेतील अर्थसंस्थांमध्ये होणारा भ्रष्टाचार केवळ त्यात होणाऱ्या आर्थिक उलाढाल या एका निकषावर जरी मोजला तरी त्याचं परिणाम भारतातल्या बोफोर्स-हर्षद मेहता - तेलगी या प्रकरणांपेक्षा कितीतरी मोठं असल्याचं आढळून येतं. आजच्या काळातील अर्थव्यवहाराच्या बदलत्या स्वरूपामुळे या संस्थात्मक भ्रष्टाचाराचं स्वरूपही बदलत आहे.

जागतिकीकरणाबरोबर इलेक्ट्रॉनिक पैशाचं आगमन झालं. पारंपरिक भ्रष्टाचारातील देवाणघेवाणीचा काहीतरी परस्पर संबंध असतो. उदाहरणार्थ, माझ्या मालकीच्या दोन इमारती आहेत, त्यांचं मूल्य दहा कोटी रुपये आहे. त्याच्या अनधिकृत विस्तारासाठी मी एक लाख रुपये लाच देतो, तेव्हा त्या एक लाखाच्या दहा कोटीच्या स्थावर इमारतींशी संबंध असतो. मात्र इलेक्ट्रॉनिक पैशाच्या व्यवहारांमध्ये असा वास्तव संबंध असतोच असं नाही. त्यामुळे या भ्रष्टाचाराचं स्वरूप बदलतं. या संस्थांवर जेव्हा वास्तवाशी सामना करायची वेळ येते तेव्हा हा भ्रष्टाचार एकदम प्रकाशात येतो.

'डेरिव्हेटिव्हज्' आणि 'हेज फंड' हे अशा इलेक्ट्रॉनिक पैशाचं एक उदाहरण. शेअर्सचे वरखाली होणारे भाव, त्यांच्यावरील सट्टेबाजीचा हेज फंड हा एक प्रकार. आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या सगळ्याच बँकांमध्ये आता हेज फंडसाठी एक स्वतंत्र विभाग असतो. देशोदेशीच्या शेअर बाजारांच्या निर्देशांकावर अहोरात्र सट्टा चालतो. ही सट्टेबाजी करणारे तज्ज्ञ बँकांमध्ये नोकरीला असतात. बँकांचा नफा या व्यवहारातून वाढत असल्याने या व्यवहाराच्या नैतिकतेकडे आणि कायदेशीरपणाकडे बँका दुर्लक्ष करतात. या वर्षीच्या जानेवारीमध्ये 'सोसायटी जनरल' नावाची फ्रान्समधील दुसऱ्या क्रमांकाची बँक सट्टेबाजीतील गैरव्यवहारांमुळे एकदम प्रकाशात आली. या बँकेतील एका कर्मचाऱ्यानं बेनामी आणि अवाजवी सट्टेबाजी केली. त्यामुळे बँकेला मोठा तोटा सोसावा लागला. भारतीय रुपयांमध्ये सांगायचं तर हा तोटा तीस हजार कोटी रुपयांचा होता! हा तर निव्वळ तोटा, म्हणजे प्रत्यक्ष व्यवहार त्याच्या कित्येक पटींनी जास्त होता. विशेष म्हणजे, या प्रकरणात त्या कर्मचाऱ्याला वैयक्तिक लाभ झाल्याचं हा लेख लिहीपर्यंत तरी निष्पन्न झालेलं नव्हतं. अशा प्रकरणात वैयक्तिक लाभ होत नाही. कर्मचाऱ्यांनी अशी प्रामाणिक समजूत असते, बँकेने त्यांना नफा वाढवण्यासाठी नोकरीवर ठेवलं आहे आणि आपण ते काम करत आहोत. एका कॅनेडियन बँकेच्या लंडनमधील ऑफिसातल्या एका कर्मचाऱ्यामुळे अशाच प्रकारच्या व्यवहारात बँकेला मोठा तोटा झाला. मागच्या वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये हे प्रकरण बाहेर आलं. या बँकेला काही लाख पौंड दंडही झाला. मात्र या प्रकरणातही त्या कर्मचाऱ्याला वैयक्तिक लाभ झाला नव्हता. स्वीडनमधल्या एका बँकेतही असेच गैरव्यवहार झाल्याचं गेल्यावर्षी उघडकीला आलं होतं. १९९५ साली सिंगापूरमध्ये नोकरीला असलेल्या एका ब्रिटिशाने त्याच्या बँकेया वतीने जपानी शेअरबाजारात अनेक अवाजवी वायदे केले. या वायद्यांची एकूण किंमत बँकेच्या किंमतीहूनही जास्त होती. हे वायदे पाळणं शक्य न झाल्यामुळे बेरिंग्ज नावाची ब्रिटिश बँक बुडाली. 'सोसायटी जनरल' या बँकेवरही हीच वेळ येऊन ठेपली होती. पण त्या कर्मचाऱ्याने काही साध्या चुका केल्या आणि तो सापडल्यामुळे ही बँक बचावली.

इथे अशी प्रकरणे दर काही महिन्यांनी बाहेर येतात आणि आर्थिक नुकसानीचे आकडे अतिविक्राळ असतात. अशा प्रकारचा भ्रष्टाचार पारंपरिक भ्रष्टाचाराच्या व्याख्येत बसत नाही. बहुतेक वित्तसंस्थांचा कल अंतर्गत चौकशी करून, संबंधित कर्मचाऱ्याला निलंबित करून प्रकरण दाबून टाकण्याकडे असतो. गोष्टी अगदीच हाताबाहेर जायला लागल्या तर 'बातमी' होते आणि पोलिसांकडे प्रकरण सुपूर्द होतं. 'बातमी' झाली तर वित्तसंस्थेच्या प्रतिमेला तडा जातो. तिच्या विश्वासार्हतेला धक्का पोचतो. तिच्या व्यवसायावर परिणाम होतो म्हणून अर्थसंस्था हे टाळण्याचा प्रयत्न करतात. 'सोसायटी जनरल' च्या चेअरमनवर लगेच राजीनाम्याचं दडपण आलं. या बँकेची किंमत उतरल्याने इतर बँका ही बँक विकत घ्यायला पुढे सरसावल्या. बँकेची मालकी बदलली तर जुन्या कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या धोक्यात येणार म्हणून कर्मचारीच आता चेअरमनला काढू नका असा आग्रह धरत आहेत!

पश्चिमेच्या संस्थात्मक भ्रष्टाचाराचा आणखी एक प्रकार म्हणजे इतर देशांमध्ये उद्योग-व्यवसायाच्या संधी मिळवण्यासाठी लाचलुचपत देणं, आपल्या संस्थेला कंत्राटं मिळावीत, उद्योग स्थापण्यास परवानगी मिळावी यासाठी इतर देशांमधल्या शासन व्यवस्थेचे हात ओले करण्याची पश्चिमेची जुनी परंपरा आहे. भारतात गाजलेलं 'बोफोर्स' प्रकरण याच प्रकारातलं. अशी अनेक उदाहरणं देता येतील. खरंतर, हा

पारंपरिक भ्रष्टाचाराचाच भाग आहे आणि तो सर्वश्रुत आहे. तथापि, गरीब-अविकसित राष्ट्रांना पश्चिमेकडून जी आर्थिक वा अन्य प्रकारची मदत दिली जाते. त्यामध्येही संस्थात्मक भ्रष्टाचार घडतो. या संदर्भात उदाहरण म्हणून दुसऱ्या इराक युद्धाआधी राबवल्या गेलेल्या 'तेलाच्या बदल्यात अन्न' या योजनेकडे थोडं विस्ताराने पाहता येईल.

इराकच्या पहिल्या युद्धानंतर, म्हणजे १९९५ सालापासून इराकच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर निर्बंध घालण्यात आले. इराकची आर्थिक नाकेबंदी झाली की, सद्दाम हुसेनची राजवट कोसळेल असा यामागे अंदाज होता. या निर्बंधांमुळे इराकला खनिज तेलाची निर्यात करता येईना व अन्नधान्याची आयात करता येईना. मात्र हे निर्बंध लादल्यानंतर आंतरराष्ट्रीय समुदायाला जाणीव झाली की, या निर्बंधांमुळे सद्दाम हुसेनला धक्का पोहोचणं दूरच राहिलं. इराकच्या जनतेचेच हाल होताहेत. जनतेला रोजच्या गरजेच्या वस्तू, औषधं यांचाच पुरवठा थांबला आणि काळ्या बाजाराला सुरुवात झाली. मग 'तेलाच्या बदल्यात अन्न' ही योजना बिल क्लिंटन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असताना पुढं आली. इराकचं खनिज तेल घ्यायचं, पण पैसे रोख द्यायचे नाहीत. कारण पैशात मोबदला दिला, तर तो सद्दामच्या राजवटीलाच मिळणार आणि इराकचं लष्करी सामर्थ्य वाढवण्यासाठी खर्ची पडणार हे उघड होतं. म्हणून पैशांऐवजी अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा इराकला पुरवठा करायचा अशी ही योजना होती. संयुक्त राष्ट्रसंघाने ही योजना इराकच्या दुसऱ्या युद्धापर्यंत, म्हणजे २००३ सालापर्यंत राबवली. २००१ पासून या योजनेतील भ्रष्टाचार उघड होऊ लागला. या कार्यक्रमाच्या प्रमुखाने, म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका अधिकाऱ्याने लाच खाल्ल्याचं उघडकीला आलं. इराकची वकिली त्यांच्या त्यांच्या देशात करावी म्हणून एक ब्रिटिश खासदार, फ्रान्सचा गृहमंत्री, पोपचा एक सहकारी, रशियाचा एक राजकारणी नेता वगैरे मंडळींना तेलविक्रीचे अधिकार देण्यात आल्याचं उघड झालं. या योजनेचा एकूण खर्च ६५० कोटी डॉलर्स होता. त्यातले १००-१५० कोटी लाचेपोटी पाश्चिमात्य कंपन्यांना, राजकारण्यांना, पदाधिकाऱ्यांना तरी मिळाले किंवा सरळ परत सद्दाम हुसेनच्या खिशात गेले. केवळ पैशाचीच अफरातफर झाली, असं नव्हे तर या योजनेदरम्यान इराकला पुरवण्यात आलेलं अन्नधान्यही निकृष्ट दर्जाचं होतं असं आढळून आलं.

या साऱ्या प्रकरणात अफरातफर प्रत्यक्ष कशी झाली त्याचं एक उदाहरण पाहू. जेव्हा संयुक्त राष्ट्रसंघासारखी संघटना अशी एखादी योजना आखते, तेव्हा इतर देशांच्या, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आणि स्वयंसेवी संघटनांच्या मदतीची अपेक्षा गृहीत धरलेली असते. संयुक्त राष्ट्रसंघ स्वत: काही अन्नधान्य उत्पन्न करत नाही किंवा औषधं बनवत नाही. त्याचं काम या सगळ्या पुरवठ्याचा मेळ घालणं. संयुक्त राष्ट्रसंघाच्या नावाखाली प्रत्यक्ष व्यवहार निराळ्याच संस्था करतात, मग ते निरनिराळे देश असतील, बहुराष्ट्रीय कंपन्या असतील किंवा बहुराष्ट्रीय स्वयंसेवी संघटना असतील. अशा हजारो संस्था या योजनेत सहभागी होत्या. अशा संस्थांपैकी 'प्रामाणिक' कोण आणि अप्रामाणिक कोण याची सतत आणि सतर्क पाहणी अशक्य असते. 'प्रामाणिक' संस्थांमध्येही दोन प्रकार असतात. एक म्हणजे नफ्याची अपेक्षा नसणारे देश किंवा स्वयंसेवी संघटना. ते आपल्या स्वत:च्या गंगाजळीतून किंवा त्यांच्या सभासदांच्या देणगीतून मदत उभी करतात आणि पुरवतात. दुसरा प्रकार म्हणजे यथायोग्य नफा मिळवू पाहणाऱ्या व्यापारी कंपन्या. अप्रामाणिक संस्था म्हणजे कचरा पुरवून सोन्याचा मोबादला मिळवणाऱ्या संस्था किंवा बँका. इराक मदत योजनेमध्ये बी.एन.पी. ही फ्रेंच बँक एकमेव बँक होती. या बँकेद्वारे सगळा पैसा हाताळला गेला. चौकशीत असं उघड झालं की, या बँकेने काटेकोर चौकशी न करता काही व्यक्तींना किंवा संघटनांना मोठ्या प्रमाणात पैसा दिला. या सगळ्या प्रकरणात या बँकेनेही प्रचंड नफा कमवला.

या योजनेआधीपासूनच इराकला गहू पुरवणारा ऑस्ट्रेलिया हा प्रमुख देश होता. ऑस्ट्रेलियन व्हिट बोर्ड (एडब्ल्यूबी) ही गव्हाची निर्यात करणारी ऑस्ट्रेलियाची मक्तेदार संस्था. या योजनेअंतर्गत फार मोठ्या प्रमाणावर गहू इराकला रवाना झाला. हा गहू प्रथम जॉर्डन या देशात गेला. तिथून ट्रकने इराकमध्ये गेला. वाहतुकीचं हे कंत्राट जॉर्डनच्या एका कंपनीला देण्यात आलं. या कंपनीने अवाच्या सवा दर लावला आणि प्रचंड नफा कमवला. या नफ्यात तीन भागीदार होते. एक म्हणजे ती कंपनी, दुसरे एडब्ल्यूबी आणि तिसरा भागीदार सद्दाम हुसेनचं प्रशासन.

साधारणपणे, अविकसित देशांना होणाऱ्या मदतीमध्ये असेच प्रकार घडतात. समजा, ब्रिटिश सरकारने आफ्रिकेतील एखाद्या देशातील निर्वासितांकरता काही कोटी पौंडंची मदत देण्याचं ठरवलं, तर हा पैसा ब्रिटिश सरकार त्या देशाच्या सरकारला देत नाही कारण ते सरकार भ्रष्ट असल्याने पैसा निर्वासितांपर्यंत पोचणार नाही, याची जाणीव असते. मग तिथे कार्यरत असणाऱ्या एखाद्या स्वयंसेवी संस्थेमार्फत ही मदत केली जाते. ही मदत देण्यामागचे या संस्थेचे उद्देश निराळेच असतात. समजा, ही मदत औषधांच्या स्वरूपात आहे. आता ही स्वयंसेवी संस्था काही स्वत: औषधं बनवत नाही. मग ती एखाद्या औषध बनवणाऱ्या कंपनीकडे जाते. या कंपनीचं उद्दिष्ट नफा कमवणं हे असतं. मग औषधं ब्रिटिश नागरिक घेवोत किंवा स्वयंसेवी

संस्था. त्यातही स्वयंसेवी संस्था जर औषधं विकत घेणार असेल तर नफेखोरीला नैतिक मुलामा चढतो. नफ्याच्या प्रमाणाचीही कसून तपासणी होत नाही. वैयक्तिक ग्राहकापेक्षा संस्थात्मक ग्राहकाला फसवणं सोपंही असतं आणि त्यात पैसाही जास्त असतो. मग होतं काय, तर ही औषधं चढेल भावाने तरी स्वयंसेवी संस्थेला विकली जातात, किंवा निकृष्ट औषधं तरी पुरवली जातात. हे यदा कदाचित उघडकीला आलंच तर परिणाम काय होतो? ज्या लोकांच्या वैयक्तिक दानावर ही संस्था चालते. त्यांचा अशा उपक्रमावरचा विश्वासच उडतो. ही झाली इथली (पश्चिमेतील) गोष्ट. आफ्रिकेत ज्या लोकांपर्यंत ही औषधं पोचतात. त्यांना औषधं जर खऱ्या गुणवत्तेची असतील, तर ती अशा मार्गाने मिळणं हा आपला हक्कच वाटथो आणि त्यांचं परावलंबित्व कायम राहतं. जर औषधं निकृष्ट असतील तर ब्रिटिश सरकारने आपल्याला फसवलं असा त्यांचा ग्रह होतो. या सगळ्या उलाढालीत. वस्तुत: ब्रिटिश सरकार कुठेच नसतं, फक्त त्याचं नाव बदनाम होतं, कारण ते सतर्क नसतं.

पश्चिमेच्या देशातील संस्थात्मक भ्रष्टाचाराचं एक रूप तिथल्या निवडणुकांच्या वेळी दिसून येतं. निवडणुकांचा खर्च हा सगळ्याच लोकशाही देशांमध्ये भ्रष्टाचाराचं कुरण ठरतो. इथल्या राजकीय पक्षांना-उमेदवारांना आर्थिक-औद्योगिक संस्थांकडून देणग्या मिळतात. या देणग्या निवडणुकांच्या आधी मोठ्या प्रमाणावर येतात, पण त्यांचा ओघ सतत चालूच असतो. सरकारी धोरणांवर परिणाम करण्यासाठी, कायद्यांमध्ये आपल्या सोईच्या तरतुदी करून घेण्यासाठी सर्रास पैसे दिले जातात. ब्रिटनमध्ये अशा देणग्यांबाबत स्पष्ट आणि कागदावर तरी कडक कायदे आहेत. प्रत्येक उमेदवाराला, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना देणगी कोणाकडून, किती व केव्हा मिळाली हे निवडणूक आयोगाला कळवावं लागतं. देणगी देणारी व्यक्ती त्या पक्षाची सभासद असावी लागे, देणगी मध्यस्थामार्फत किंवा त्रयस्थामार्फत स्वीकारता येत नाही वगैरे तरतुदी या कायद्यात आहेत. पण हे सगळे नियम धाब्यावर बसवून देणग्या दिल्या-घेतल्या जातात. १९८० च्या दशकापासून दर दोन-तीन महिन्यांनी असं नवीन प्रकरण ब्रिटनमध्ये बाहेर येतं आणि भ्रष्टाचारी राजकारणी-मंत्र्यांची नावं जाहीर होतात, ते राजीनामे देतात. ब्रिटनमध्ये दोन प्रमुख पक्ष आहेत. एक हुजूर. दुसरा मजूर. १९९७ सालापर्यंत हुजूर पक्ष सत्तेवर होता. त्या निवडणुकीत या पक्षाचा पराभव होण्याचं प्रमुख कारण भ्रष्टाचार हे होतं. संसदेत आपल्याला हवे ते मुद्दे उपस्थित केले जावेत म्हणून काही कंपन्यांनी काही खासदारांना रोख रकमा दिल्याचं प्रकरण, पैसे खाऊन खोटं बोलल्याबद्दल उपाध्यक्षाला तुरुंगाची हवा खायला लागणं, कॅबिनेट मंत्र्यांनी कोणत्या तरी वशिल्याच्या कामासाठी देणगीदारांच्या खर्चाने चैनीच्या परदेशी वाऱ्या करणं वगैरे अनेक गोष्टी या पक्षाने केल्या. मजूर पक्ष सत्तेवर आल्यावर त्यांनीही ही परंपरा चालू ठेवली. इथल्या राज्यसभेवर नेमणूक व्हावी. 'लॉर्ड' ही उपाधी मिळावी म्हणून इच्छुकांनी लक्षावधी पौंडांच्या देणग्या पक्षाला दिल्याचं बाहेर आलं. या जानेवारीमध्ये अशाच लक्षावधी पौंडांच्या देणग्यांबाबत निवडणूक आयोगाला न कळवल्याबद्दल एक कॅबिनेट मंत्र्याला राजीनामा द्यावा लागला, इतर अनेक जणांच्या चौकश्या चालू आहेत. त्यात वेंडी अलेक्झांडर या स्कॉटिश पार्लमेंटमध्ये मजूर पक्षाच्या नेत्या असलेल्या बाईंचाही समावेश आहे.

अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत तर प्रचंड भ्रष्टाचार होतो. बहुराष्ट्रीय कंपन्या राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवाराला कोट्यावधी डॉलर्सचा देणग्या देतात. तो राष्ट्राध्यक्ष झाल्यास आपल्या सोयीची धोरणं राबवेल अशी त्यांची अपेक्षा असते. या भ्रष्टाचाराला कायदेशीर भ्रष्टाचार म्हणता येईल. कारण या देणग्यांच्या रकमा जाहीर असतात. देणगी देणाऱ्या कंपन्यांना 'बक्षीसी' ही निवडणुकांनंतर मिळते. अमेरिकेत राजदूतासारख्या पदांवरील नेमणुका अशा उपकारांची परतफेड करण्यासाठी असतात. क्लिंटन यांच्या कारकिर्दीत तर व्हाईट हाऊसमध्ये राष्ट्राध्यक्षाबरोबर नाश्ता करायची किंमतसुद्धा ठरलेली होती! सध्याचे उपराष्ट्राध्यक्ष डिक चेनी आधी हॅलिबर्टन या कंपनीचे प्रमुख होते. इराक युद्धानंतर इराकच्या पुनर्बांधणीचं मोठं कंत्राट निविदा न काढता हॅलिबर्टला देण्यात आलं. त्यातून या कंपनीने अमाप पैसा कमावला.

संस्थेतले गैरव्यवहार बहुधा कोणीतरी कर्मचारीच बाहेर काढतो. ब्रिटन किंवा अमेरिकेत असा कर्मचारी वृत्तपत्रांशी संपर्क साधतो आणि ही माहिती काही किंमतीला विकतो. कारण एकदा नाव उघड झाल्यावर अशा कर्मचाऱ्याची नोकरी टिकणं अशक्य असतं. ब्रिटनमध्ये मध्यंतरी एक टीव्ही कार्यक्रम फार लोकप्रिया होता. त्याच्या शेवटी प्रेक्षकांना प्रश्न विचारले जात. प्रेक्षकाने एक फोन करायचा आणि आपलं उत्तर नोंदवायचं. हे फोन महागडे असत. मग त्याची लॉटरी काढली जाई आणि विजेत्याला मोठं घबाड मिळे. गरीब थरातले लोक मोठ्या प्रमाणावर यात भाग घेत असत. हा कार्यक्रम तयार करणाऱ्या कंपनीतल्या एका बाईच्या असं लक्षात आलं की, निकाल आधीच ठरलेले असतात. टीव्हीवर चालू असतो तो फक्त देखावा. तिने तिच्या वरिष्ठांकडे ही बाब नोंदवल्यावर तिला त्याकडे दुर्लक्ष करण्यास सांगण्यात आलं. शेवटी तिने वर्तमानपत्राकडे धाव घेतली. आता त्या वाहिनीला जबरदस्त दंड झाला आहे. अमेरिकेत तर सरकारच भ्रष्टाचाराची माहिती देणाऱ्या कर्मचाऱ्याला विशिष्ट टक्केवारीची रक्कमभेट देतं,

जेणेकरून या उद्योगांना आळा बसेल. पण आधी म्हटल्याप्रमाणे, जर राष्ट्राध्यक्षच विकला गेलेला असेल तर अशा उपायांचा फारसा परिणाम होत नाही. जानेवारीपर्यंतच हिलरी क्लिंटन आणि बराक ओबामा या डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारांनी कोट्यवधी रुपयाचा निधी गोळा केला आहे आणि खर्चही केला आहे. हा पैसा देणाऱ्यात सामान्य माणसाचा सहभाग फार कमी आहे. बहुतेक सगळा पैसा बड्या कंपन्यांकडूनच आलेला आहे आणि त्या कंपन्या त्यांची किंमत वसूल करणार हे नक्की.

पश्चिमेतील भ्रष्टाचाराचं एकंदरित चित्र हे असं आहे. पश्चिमेतल्या अशा भ्रष्ट व्यवहारांचा परिणाम विकसनशील जगावरही होतो, तिथल्या भ्रष्टाचाराला यातून बळ मिळून तिथल्या गरीबांना याची झळ पोहचते. पश्चिमेतल्या सामान्य जनतेलाही महागाई-बेरोजगारी अशा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात या भ्रष्टाचाराची झळ पोहचत असते. त्यामुळेच लोकशाहीत लोकांच्या खऱ्याखुऱ्या सहभागाला फारच थोडा वाव राहिलेला आहे, असा विचारप्रवाह आता इथे बळावत आहे.

चन्द्रशेखर पुरन्दरे
Email - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com

❐